# करोनाचा भारतीय राजकीय व्यवस्थेवर होणारा परिणाम

प्रा.डॉ.मनिष सोनवणे

विभागप्रमुख, राज्यशास्त्र, म.स.गा.महाविदयालय, मालेगाव

**प्रस्तावना:**

जागतिक आरोग्य संघटनेने करोना (कोविड१९) रोगास जागतिक महामारी घोषित केल्यानंतर हे सिद्ध झाले कि कोरोनामुळे जागतिक राजकीय व्यवस्थेस अनेक बदलांना सामोरे जावे लागणार आहे जागतिक महासत्तामधील परस्पर संबंधांची पुनर्रचना होऊन संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुनर्रचनेचा देखील पाठपुरावा केला जाईल.देशांतर्गत परिस्थितीचा विचार केल्यास हे लक्षात घेतले पाहिजे की, देशाच्या सामाजिक, राजकीय आर्थिक, धोरणांवर देखील कोरोनाचा परिणाम हा क्रमप्राप्त ठरेल. अर्थात आजमितीस याचा नेमका काय परिणाम होईल हे सांगणं जरी धाडसाचं असलं तरी भविष्यातील चित्र रेखाटण्याचा प्रयत्न आज सर्वच क्षेत्रातील अभ्यासक करीत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात करोना या महामारीचा भारतीय राजकीय व्यवस्थेवर काय परिणाम होईल याचा अभ्यास करण्यात आला आहे .

**लोकशाही राज्यापुढील आव्हाने** –

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. लोकशाही व्यवस्थेत निर्णय निर्णय निर्मिती प्रक्रियेत सामान्यातला सामान्य माणसाचा देखील सहभाग होतो.म्हणून आज लोकशाही हा जवळपास जगातील बहुतांश देशांच्या राजकीय व्यवस्थेचा एक अविभाज्य शासन प्रकार बनला आहे लोकशाही व्यवस्थेचे काही दोष देखील मान्य केले जातात. जसे, निर्णय प्रक्रियेस लागणारा विलंब, निरर्थक – चर्चा, कणखर नेतृत्वाचा अभाव, संकटकालीन काळात धोरण निर्मितीत घातला जाणारा घोळ इत्यादी. लोकशाही हा चांगला शासन प्रकार असला तरी निर्णय निर्मिती आणि त्यांच्या अंमलबजावणी प्रसंगी इतर शासन प्रकारापेक्षा म्हणजेच हुकूमशाही पेक्षा डावा ठरतो हे निश्चित. अर्थात हि बाब लोकशाहीसाठी मारक आहे. पण हेच खरे लोकशाहीचे सौंदर्य आहे असा दावा आजपर्यंत लोकशाहीवादी करत आलेले आहेत आणि यात तथ्य देखील आहे. लोकशाहीचे महत्त्व नाकारता येणारे नाही परंतु जागतिक महामारीसारख्या वेळी आज लोकशाहीसमोर एक मोठे आव्हान उभे राहत आहे ते हे कि, लोकशाही शासन प्रकारांपेक्षा हुकूमशाही किंवा एकपक्षीय राजवट असलेल्या राज्यांमध्ये तातडीने पाऊले उचली गेली. तसेच कठोर निर्णयांची अंमलबजावणी देखील प्रभावीपणे करता आली. तिच्यामुळे करोनासारख्या महामारीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात लोकशाही राष्ट्राच्यातुलनेत त्या राष्ट्रांना आणि त्यांच्या नेत्यांना मोठे यश मिळालेआहे. युरोपीय देश, अमेरिका, भारत यांच्या तुलनेत चीन, उत्तर कोरिया. सौदी अरेबिया यांची कामगिरी तुलनेने सरस ठरली आहे. त्यामुळे नजीकच्या काळात लोकशाही शासन व्यवस्थांवर दबाव हा आणखी वाढणार आहे. भारतात देखील लष्कराला पाचारण करण्याची मागणी अनेक ठिकाणी केली जात आहे हे धक्कादायक आहे. मुळात गेल्या दोन दशकांपासून लोकशाही शासन प्रकार जमातवाद्यांचा आणि कट्टर राष्ट्रवाद्यांच्या दबावाखाली काम करीत आहे. यातच करोनाच्या आव्हानामुळे लोकशाही शासन प्रकारांचा आता कस लागणार आहे.

भारतासारख्या मोठ्या लोकशाहीप्रधान देशात जेथे मोठ्या प्रमाणावर विविधता आहे. नैसर्गिक साधनांची कमतरता असून प्रचंड लोकसंख्या आणि आणि मर्यादित साधनसंपत्ती याचा उपयोग करून भारतीय राजकीय व्यवस्था करोनाचे संकट कितपत पेलेल? हे आज सांगणे अशक्य आहे आणि हे आह्वान पेलताना भारतीय राजकीय व्यवस्थेतील लोकशाही मुल्ये, परंपरा यांचे पालन कसे होईल आणि त्यास भारतीय सर्वसामान्य जनता कसा प्रतिसाद देईल हे पाहणे मनोरंजक ठरेल.

**भारतातील संसदीय शासनपद्धती-**

आजच्या संकटकाळात भारतीय पंतप्रधानांचे स्थान व त्यांच्या कार्यप्रणालीचे स्वरूप हे अमेरिकन अध्यक्ष सारखे बनले आहे. मुळात नरेंद्र मोदी यांच्यामुळे २०१४ पासून कमकुवत विरोधी पक्ष आणि सक्षम विरोधी नेत्यांच्या अभावामुळे भारतीय लोकशाही ही की एकपक्षीय प्रबळ राजकीय व्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. असे असताना करोनासारख्या संकटामुळे संसदीय राजकारणाला मर्यादा येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. संसदीय चर्चा, वादविवाद यापेक्षा एक राष्ट्रप्रमुख प्रभावीपणे आपले निर्णय,धोरणे प्रसार माध्यमांच्या द्वारे किंवा थेट जनतेशी संवाद साधून करू शकतो हे गेल्या काही दिवसांत सिद्ध झाले आहे. त्यामुळे अशा निर्णय प्रक्रियेमुळे विरोधीपक्ष तसेच संसद यांच्या अधिकाराचा संकोच होतो.

जनमताचा रेटा माझ्यासोबत आहे असा दावा केला जातो आणि त्यात तथ्यदेखील असले तरी यामुळे संसदीय राजकारणास मर्यादा येतात.

संसदीय लोकशाहीचे दुसरे वशिष्ट म्हणजे पंतप्रधानसोबत असलेले मंत्रिमंडळ मुळात २०१४ पासून मोदींच्या तुलनेत कोणत्याही भाजपाच्या मंत्र्यांमध्ये जनतेशी थेट संवाद साधण्याचे कौशल्य नाही किंवा मोदी यांच्या तुलनेत अमित शहा वगळता इतर नेत्यांची कामगिरी फारशी प्रभावी ठरलेली नाही अशा परिस्थितीत संसदेप्रमाणेच कार्यकारी मंडळ यांचे अधिकार देखील संकुचित होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. करोनानंतरच्या कालखंडात अशी मागणी होऊ शकते की एक व्यक्ती जर प्रभावीपणे देश चालविण्यास सक्षम असेल तर मंत्रिमंडळ आणि संसदेवरील चर्चेसाठी अनावश्यक खर्च हा अनाठायी ठरत नाही काय? तसेच राज्यांमध्येही घडत आहे स्वत मुख्यमंत्री हे सर्वेसर्वा भूमिकेत वावरत आहेत यातून व्यक्तिवादी राजकारण अधिक प्रबळ होण्याची शक्यता नाकारता यात नाही.यातून सामुहिक जबाबदारीचे तत्वास हरताळ फासला जाऊ शकतो.

**प्रशासकीय आणीबाणी आणि व्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने -**

एरवी व्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधनांबाबत कायमच व्यक्ती विरुद्ध राज्य असा संघर्ष सुरु असतो. लोकशाही देशात तो सातत्यपूर्ण होत असतो. करोनाच्या निमित्ताने राज्यव्यवस्था कधी नव्हे एवढी सक्षम बनली आहे आणि तिच्या हातात अनियंत्रित अधिकार आले आहेत की, ज्यामुळे ती व्यक्तीच्या दैनंदिन जीवन आणि हालचालींवर सुद्धा बारीक लक्ष ठेवू शकत आहे. व्यक्तीने कधी बाजारपेठेत खरेदीला जावं? किती वेळा? व कोणत्या दिवशी जाव? कोणत्या दुकानावरून माल खरेदी करावा? यासारख्या बारीक बाबींचा यात समावेश आहे. माहितीच्या आदान प्रदानाचे स्वातंत्र्य कोणती असावीत? वृतपत्रे प्रकाशित करण्यास परवानगी द्यावी कि नाही यावर देखील सरकारचे नियंत्रण आहे. निरनिराळी व्हॉट्सअप ग्रुप, फेसबुक अकाऊंट्स, ट्विटर इत्यादी. यावर सरकारचे नियंत्रण आहे किंवा तसे असल्याचा दावा करणारे संदेश विविध प्रसारमाध्यमांतून, वृत्त वाहिन्यांतून फिरत आहेत.सरकारी अधिकारी, पोलीस दलातील प्रमुख हे दंडात्मक कारवाई करतात आणि त्याला प्रसिद्धी देतात याचा अर्थ प्रशासनाची किंवा व्यवस्थेची चूक दाखवणं हा सुद्धा एक गंभीर गुन्हा होत आहे. प्रसंगी त्या व्यक्तीस देशद्रोहाच्या कलमाखाली अटक करणे हे सोप होणार आहे.

करोना महामारी नंतर देखील परत पूर्ववत जीवन होत असताना यातील किती अंकुश संपुष्टात येतील हे पाहणे महत्वाचे ठरेल. प्रसिद्ध साहित्यक जॉर्ज ओर्वेल याच्या १९८४ या कादंबरीतील कथानक करोनाच्या निमित्ताने आपणास अनुभवास येत आहेत. व्यक्तीच्या सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक,धार्मिक अशा सर्व व्यवस्थांवर अंकुश ठेवण्याचा अधिकार राजकीय व्यवस्थेला करोनाने मिळवून दिला आहे. राष्ट्रहिताच्या व सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून व्यक्तीस्वातंत्र्य हे दुय्यम असल्याचे प्रतिबिंब आज समाज जीवनात वावरताना दिसते. त्यामुळे भविष्यात राष्ट्राच्या हितासाठी व्यक्तीने बळी देणे हे आवश्यक आहे हि भावना बळावण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणूनच भारतातील राज्या-राज्यातील नागरिकांचे आणि मजुरांचे स्थलांतर हे किती दुय्यम आहे हे आपणास पहावयास मिळाले.

सध्याच्या राजकीय परिस्थितीचे वर्णन काही समाजशास्त्रज्ञ प्रशासकीय आणीबाणी असा देखील करीत आहेत . सर्वसाधारण परिस्थिती नसताना आणीबाणीची तरतूद .नागरी आणि पोलीस प्रशासनाकडे अधिकार केंद्रित झाले आहेत भारतीय राज्यघटनेत आहे तिचे स्वरूप हे राजकीय अथवा आर्थिक असतेकटात प्रशासन हे परंतु सध्याच्या सं . पोलीस प्रशासनाकडे .भारतातील हजारो लोकप्रतिनिधींचे अधिकार एक प्रकारे गोठवण्यात आले आहेत .अग्रस्थानी आहे भारताच्या .कायदा व सुव्यस्था राखन्यासोबतच समाज नियंत्रणाचे व संचलनाचे कार्य देखील करावे लागत आहे फाळणीनंतर पहिल्यांदा एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे स्थलांतर झाले आहे असे आताच मानले जात आहे व याचे संचलन प्रशासनाच्या नियंत्रणाखाली होत आहेत्यामुळे अनेक ठिकाणी जनता विरुद्ध प्रशासन तसेच प्रशासन विरुद्ध राजकीय पक्ष . .असा संघर्ष उद्भवत आहेत

**संघराज्यापुढील आव्हाने –**

भारतीय संघ राज्य हे अमेरिकन संघराज्याप्रमाणे बलशाली नाही असे असले तरी सत्तेचे विभाजन करताना घटनाकारांनी मुख्य विषय ज्यात राष्ट्रहित आणि आर्थिक स्त्रोत मोठ्या प्रमाणात आहेत असे विषय हे केंद्राकडे आहेत. तसेच राज्याकडे असलेल्या महत्वाच्या विषयांवर सुद्धा केंद्र कायदा करू शकते. समवर्ती सूचीतील विषयांवर केंद्राचा कायदा अंतिम राहतो तसेच ऑस्ट्रेलियाप्रमाणे घटनेने विशेषाधिकार हे भारतीय केंद्र सरकारकडे दिलेले आहे. याचा अर्थ

भारताच्या घटनात्मक चौकटीत राज्याच्या तुलनेत केंद्र हे खूप मजबूत आहे. अनेकदा दक्षिणेकडील राज्यांनी अशी टीका केलेली आहे की,केंद्र हे काल्पनिक असून राज्य हेच वास्तव आहेत. भारतात संघराज्याची निर्मिती ही केंद्रोत्सारी पद्धतीने झालेली असल्यामुळे केंद्राचा अधिकार हा अंतिम असतो. भारतीय संघराज्यात राज्यांची आर्थिक व्यवस्था ही खूपच कमकुवत आहे. त्यांच्याकडे मर्यादित आर्थिक संसाधने आहेत मात्र जबाबदारी जास्त असल्याने त्यांना केंद्रावर अवलंबून राहावे लागते. नुकत्याच झालेल्या जीएसटीमुळे तसेच नोटाबंदीमुळे राज्य सरकारांचे कंबरडे मोडलेले आहे. सातवा वेतन आयोग, कृषी क्षेत्रात झालेली घट, कर्जमाफी, उद्योग क्षेत्रासमोरील अडचणी तसेच सेवा क्षेत्राचा झालेला मर्यादित विकास यामुळे मुळातच घायाळ असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला करोनाच्या संकटांमुळे मोठ्या आव्हानास सामोरे जावे लागत आहे. राज्य सरकारे तर पूर्णत: घायाळ झालेली आहेत केंद्राकडून जी.एस.टी.मुळे राज्यांना मिळणारी मदत कमी झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था यांची आर्थिक अवस्था सतत बदलत गेलेल्या कर रचनेतील बदलांमुळे खिळखिळी झाली आहे. त्यामुळे ती नजिकच्या राज्ये अजूनच केंद्रावर अवलंबून राहतील.त्यातून केंद्र राज्य संबंधात आणखी कटुता वाढेल.

केंद्रात भाजपासारख्या मजबूत पक्षाचे सरकार अस्तित्वात असताना ज्या राज्यांमध्ये भाजप विरोधी सरकारे आहेत त्यांची स्थिती अधिक केविलवाणी होणार ,कारण की त्यांना केंद्राची हवी तेवढी मदत मिळत नाही असा ते आरोप आजच करीत आहेत आणि आजवरचा केंद्र –राज्य संघर्षातील सर्वपक्षीय अनुभव लक्षात घेतल्यास ते पूर्णतःचुकीचे आहे असेही म्हणता येणार नाही.दुसरीकडे केंद्राकडून असा आरोप केला जात आहे की भाजपशासित राज्यांच्या तुलनेत विरोधी पक्षांची राज्यसरकारे करोनाला अटकाव घालण्यास कमी पडत आहेत.महाराष्ट्र,पंजाब,केरळ आणि केंद्र यातील संघर्षातून हे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे केंद्राचे प्रतिनिधी असलेले राज्यपाल आणि संबधित राज्यांचे मुख्यमंत्री यांच्यात देखील ध्येय धोरण निश्चितीवरून वाद निर्माण होत आहेत.उदारणार्थ महाराष्ट्रात विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याच्या निर्णयासंदर्भात राज्यपालांनी परस्पर बोलवलेल्या बठकीबाबत सत्तारूढ महाविकास आघाडीने आक्षेप घेतला होता.

अशाप्रकारे, केंद्र आणि राज्य यांच्यामध्ये कमालीचा ताणतणाव करोनाच्या निमित्ताने दिसून येत आहेत. करोनाच्या समाप्तीनंतर राज्यांच्या अर्थव्यवस्था या कोलमडलेल्या असतील आणि त्यांना केंद्रावर अधिक विसंबून राहावे लागेल त्या वेळेस केंद्र राज्य संबंध आणखी तीव्र होतील. त्यात बिगर भाजपाशासित राज्ये अस्थिर करण्यासाठी प्रयत्न सत्तापक्षाकडून होतील किवा ती सरकारे स्वत अडचणीत येतील कारण या राज्यांना आर्थिक मदतीशिवाय लोकाभिमुख सेवा देणे व राज्याचा प्रशासकीय कारभार हाकणे अवघड होईल आणि त्यानिमित्ताने राज्य सरकारे व त्यांच्या नेतृत्वाच्या मर्यादा स्पष्ट होतील.

**प्राधान्यक्रमात बदल अपेक्षित –**

भारतीय राजकीय चर्चाविश्वात आरोग्य आणि पर्यावरण यासारख्या विषयांना फारसे महत्व राहिलेले नाही अर्थात. देशाला ७० वर्षे स्वातंत्र्यास झालेली असली तरी एक राष्ट्र म्हणून हा कालखंड फार मोठा आन्ही आपला देश विकसनशील असल्याने आपल्या गरजा आणि लोकसंख्या विचारात घेतल्यास गरिबीबेरोजगारी यावर मत करण्यासाठी उद्योग ,महागाई, च पाकिस्तान आणि चीन सारखे देश आपल्याला शेजारी असल्याने तसे.उभारणी व शेती सुधारणेस प्राधान्य द्यावे लागले शिक्षण आणि आरोग्य सारख्या महत्वाच्या विषयांवर आपण मुळा.आपणास फार मोठा खर्च सुरक्षेवर करावा लागत आहेत पायाभूत संरचना देखील उभ्या करू शकलो नाहीत हे खेदाने काबुल करावे लागेलर हजार आज देशात डॉक्टरांची संख्या द . .०भारतीयांमागे ५ एवढी आहे जी शेजारील पाकिस्तान पेक्षाही कमी आहे यावरून आपल्या आरोग्य यंत्रणेची अवस्था आपणास लक्षात येतेनंतर भारताने मिश्र अर् १९९० .थव्यवस्थेचा त्याग करून 'खाऊजा' धोरण स्वीकारले त्यामुळे खाजगीकरणास मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्याचे स्वीकारले आहेपरिणामत सरकारी संस्था आणि कर्मचारी यांची संख्या . परंतु अचानक आलेल्या या संकटामुळे पुन्हा सरकारीकरणाच .मर्यादित ठेवण्याचे धोरण अस्तित्त्वात आले ी मागणी एका गटाकडून होऊ शकते कारण सेवा आणि नफा यातील कशास प्राधान्य द्यावे हे देखील आपल्या राजकीय व्यवस्थेस भविष्यात पहावे लागेल तसेच आरोग्य आणि शिक्षण.– संशोधन या बाबींवर पुन्हा सरकारला गुंतवणूक करावी लागेलराजकीय पक्षांना देखील आपआपल्या निवडणूक जाहीरनाम.्यात आरोग्य या विषयास प्राधान्य द्यावे.१लागेल जी सध्या केवळ देशाच्या वार्षिक अंदाजपत्रकात आरोग्यावर भरघोस तृत करावी.लागेल.५ % .आहेथोडक्यात करोनानंतर भारतीय राजकीय चर्चा विश्वात आपले प्राधान्य क्रम नेमके कोणते याबाबत मोठ्या प्रमाणात मंथनास सुरुवात होईल.

**अनुमान-**

१. गेल्या दोन दशकांपासून लोकशाही शासन प्रकार जमातवाद्यांचा आणि कट्टर राष्ट्रवाद्यांच्या दबावाखाली काम करीत आहे. यातच करोनाच्या आव्हानामुळे लोकशाही शासन प्रकारांचा आता कस लागणार आहे. हे आह्वान पेलताना भारतीय राजकीय व्यवस्थेतील लोकशाही मुल्ये, परंपरा यांचे पालन कसे होईल आणि त्यास भारतीय सर्वसामान्य जनता कसा प्रतिसाद देईल हे पाहणे महत्वाचे ठरेल. यातून व्यक्तिवादी राजकारण अधिक प्रबळ होण्याची शक्यता नाकारता यात नाही.यातून सामुहिक जबाबदारीचे तत्वास हरताळ फासला जाऊ शकतो.

२. राष्ट्रहिताच्या व सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून व्यक्तीस्वातंत्र्य हे दुय्यम असल्याचे प्रतिबिंब आज समाज जीवनात वावरताना दिसते. त्यामुळे भविष्यात राष्ट्राच्या हितासाठी व्यक्तीने बळी देणे हे आवश्यक आहे हि भावना बळावण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

३. करोनाच्या समाप्तीनंतर राज्यांच्या अर्थव्यवस्था या कोलमडलेल्या असतील आणि राज्येसरकारे यांना केंद्रावर अधिक विसंबून राहावे लागेल त्या वेळेस केंद्र राज्य संबंध आणखी तीव्र होतील.

४. करोनानंतर भारतीय राजकीय चर्चा विश्वात आपले प्राधान्य क्रम नेमके कोणते याबाबत मोठ्या प्रमाणात विचार मंथनास सुरुवात होईल.

संदर्भ-

१.गिरीश कुबेर –संपादकीय लेख दनिक लोकसत्ता

२वरील मुलाखत youtube channel– सुहास पळशीकर.

३ youtube channel -अच्चुत गोडबोले.वरील मुलाखत